# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**सायंकाळ**

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक ०४.१०.२०२५ शनिवार**

**नागपूर शहर पोलीसांतर्फे जनतेला आवाहन :—**

प्रतिबंधीत अन्न पदार्थाच्या (गुटखा, पान मसाला, सुगंधीत सुपारी, सुगंधीत तंबाखू असे तत्सम पदार्थ) निर्मीती, साठवणूक, वितरण, वाहतुक किंवा विक्री बाबत कोणत्याही नागरीकांना तक्रारी नोंदवायच्या असल्यास अन्न व औषध प्रशासनाने टोल फ्रि क्रमांक १८००२२२३६५ हा कार्यावींत केलेला आहे. नागपूर शहर पोलीसांतर्फे जनतेला आवाहन करण्यात येते की, प्रतिबंधीत अन्न पदार्थाच्या विक्री/वाहतुक बद्दल कोणतीही माहिती/तक्रार नोंदवायची असल्यास नागरीकांनी तक्रार नोंदविण्याकरीता हेल्प लाईन क्र. १०० तसेच डायल ११२ यावर संपर्क करावा.

**(कामगिरी)**

**१) मानकापूर पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपींना अटक, एकुण ०६ गुन्हे उघडकीस.**

दिनांक २६.०९.२०२५ चे २३.०० वा. ते दि. २७.०९.२०२५ चे ०४.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत प्लॉट नं. ९०, नटराज सोसायटी, महालक्ष्मी मंदीर जवळ, गोरेवाडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी अभय अजय पाली वय ३१ वर्षे, यांनी त्यांची हिरो स्प्लेंडर क्र. एम.एच. ३१ ई.आर ४२७३ किंमती अंदाजे ३५,०००/—रू. ची ही घरा समोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२), ३१७(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात मानकापूर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे १) शिवम देवमुरत त्रिपाठी वय २३ वर्ष रा. प्लॉट नं. ३३, गोरेवाडा, एकता नगर, मानकापूर, नागपूर २) वकील शरीफ हसन शरीफ वय ५४ वर्ष रा. प्लॉट नं. ४७, संत ज्ञानेशवर सोसायटी, मानकापूर, नागपूर ३) गुलाम नदीम गुलाम हुसैन वय २९ वर्ष रा. गल्ली नं. १०, ताजनगर, नागपूर ४) सय्यद रहमुद्यीन उर्फ शब्बू वल्द सय्यद बुरानूद्यीन वय ४६ वर्षे, रा. गल्ली नं. ८, ताजनगर, मानकापूर, नागपूर यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, आरोपींनी संगणमताने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींना अधिक सखोल विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हयाव्यतीरिक्त पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतुन स्प्लेंडर क्र. एम.पी ५० एम.ई ४६५१, किंमती २५,०००/—रू. ची तसेच मारूती सुझूकी वॅगनआर क्र. एम.एच ३१ ई.एफ ४५६९ किंमती ३,००,०००/—रू. ची, तसचे पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतुन स्प्लेंडर क्र. एम.एच ४९ बि.क्यू ०२३६, किंमती ५०,०००/—रू. ची, तसेच पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतुन ॲक्टीव्हा क्र. एम.एच ४० ए.एन ९५०६, किंमती ४०,०००/—रू. ची व एक हिरो स्प्लेंडर क्र. एम.एच ३१ बि.डब्ल्यू ८७६१ किंमती २५,०००/—रू. ची असे एकुण ०६ वाहन चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन ०५ दुचाकी व एक चारचाकी वाहन असा एकुण किंमती ५,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्रीमती सुनिता मेश्राम, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. हरीश काळसेकर, दुपोनि. अमोल इंगोल, पोउपनि. बजरंग खोमणे, सुनिल डगवाल, नापोअं. विजय यादव, पोअं. अनुप यादव, प्रविण भोयर, योगेश महल्ले व कैलास मुळे यांनी केली.



**२) सिताबर्डी पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०८.२०२५ चे १२.०० वा. चे सुमारास, फिर्यादी श्रीमती कल्पना राजू डफ, वय ५६ वर्षे, रा. प्लॉट नं. १३/१०२, अयोध्या नगर, नागपूर हया टेकडी मंदीर सिताबर्डी येथे त्यांचे पांढऱ्या रंगाची प्लेझर मोपेड क्र. एम.एच. ३१ बि.एन ५८७८ किंमती अंदाजे ३०,०००/—रू. ची ही लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीस ठाणे सिताबर्डी येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे शेख रज्जाक उर्फ रिहान वल्द शेख मुस्ताक, वय १९ वर्षे, रा. हसनबाग कब्रस्तान, पहली गल्ली, नंदनवन नागपूर यास ताब्यात घेवुन त्याचे जवळील वाहना बाबत विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीस अधिक सखोल विचारपूस केली असता त्याने पोलीस ठाणे सदर हद्दीतुन माऊंट रोड येथुन अपाची काळया रंगाची क्र. एम.एच ३६ ए.डी ९४३२ किंमती ७०,०००/—रू. ची चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन दोन्ही दुचाकी वाहने किंमती १,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. विलास शेंडे, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. विठ्ठलसिंग राजपूत, पोउपनि. श्याम वारंगे, पोहवा. नंदकिशोर वालदे, पोअं. शत्रुघ्न मुंढे, प्रशांत भोयर व चेतन शेंडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे ईमामवाडा :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी अंकीत उज्वलकुमार पगारीया वय ३१ वर्ष रा. बारादृारी, कापसी, पारडी, नागपूर हे पगारीया ओव्हरसिज प्राय. लिमी. तसेच पगारीया फुड लॅब प्राय.लिमी. या कंपनींचे मालक असुन त्यांचे पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत प्लॉट नं. २१, ऊंटखाना येथे कार्यालय आहेत. फिर्यादीचे परिचीत ब्रोकर नामे शरद जैन यांचे मार्फतीने फिर्यादीची ओळख फोनवरून पि.एल ग्लोबल इम्पेक्स, पी.टी.ई लिमीटेड नावाची म्यानंमार व सिंगापूर येथील कंपनीचे संचालक आरोपी क्र. १) विवेक दिनोदीया २) संगीता दिनोदीया ३) नरेश दिनोदीया व कंपनीचे काम पाहणारा आरोपी क्र. ४) अनिल व्यास सर्व रा. सिंगापूर यांचे सोबत झाली होती. सन २०२३ मध्ये ब्रोकर शरद जैन यांचे मध्यस्तीने फिर्यादी यांनी आरोपींचे कंपनी कडुन काळे ऊळीद व ईतर कळधान्ये विकत घेतले होते. नमुद व्यवहार सुरक्षीतपणे झाल्याने फिर्यादी यांचा आरोपींवर विश्वास बसला होता. फिर्यादी यांनी सन २०२४ मध्ये एकुण २,००० टन काळा ऊळीद किंमती २२,१०,०००/— अमेरीकन डॉलर भारतीय रूपयात मुल्य १८ करोड ३८ लाख २३ हजार १०७ रूपये चा करार करून फिर्यादी यांनी आरोपींचे खात्यात रक्कम पाठविली. परंतू दिनांक १६.०५.२०२४ ते ०३.१०.२०२५ पर्यत आरोपींचे कंपनीने करारानुसार फिर्यादीस २,००० टन काळे ऊळीद माल न देता तसेच रक्कम परत न करता वेगवेगळे कारणे सांगून टाळाटाळ करून फिर्यादी यांचा अन्याने विश्वासघात करून फिर्यादीची एकुण १८,३८,२३,१०७/—रू. ची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे सपोनि. पवार ७७१९८५८३९३ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१६(२), ३१८(२), ३१८(४), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे नविन कामठी :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०४.१०.२०२५ चे ०८.०० वा. ते ०९.१५ वा. चे दरम्यान, नविन कामठी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, नागपूर जबलपूर आऊटर रिंग रोड, निरी गावाकडील पेट्रोल पंप जवळ एक गाडी ऊभी असुन त्यामध्ये गोवंश जनावरे आहेत अशा माहितीवरून नमुद ठिकाणी जावुन गाडी क्र. एम.एच ४९ बि.झेड ३३२३ ची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये एकुण ०६ जिवंत गोवंशीय जनावरांना अवैधरित्या, निदर्यतेने, चारा—पाणी न देता बांधुन कत्तलीकरीता वाहतुक करतांना दिसुन आले. तसेच वाहनाचा समोरील डावे बाजुचा टायर निकामी दिसुन आला. तेथे हजर लोकांनी गाडीचा चालक व त्यातील एक ईसम टायर फुटल्याने वाहन सोडून पळुन गेल्याचे सांगीतले. आरोपी हे नमुद जनावरे यांना कत्तलीकरीता निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळावरून एकुण ०६ जिवंत गोवंशीय जनावरे व अशोक लेलॅण्ड कंपनीची बडा दोस्त गाडी असा एकुण किंमती अंदाजे ०९,५०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गोरक्षण येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोउपनि विकास तिडके यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. पवार ९८३४०६८८८१ यांनी आरोपींविरूध्द कलम ५(ब), ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनीयम १९७६, सहकलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे नविन कामठी :—** दिनांक ०४.१०.२०२५ चे ०७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत कन्हान नदी, उनगाव जवळ एका अनोळखी ४० वर्षे वयाचे ईसमाचे प्रेत मिळुन आले. पोलीसांनी गोताखोरचे मदतीने प्रेत पाण्याबाहेर काढुन पुढील कारवाईकरीता उप जिल्हा रूग्णालय कामठी येथे दाखल केले आहे.

याप्रकरणी फिर्यादी अनुराग नेमचंद यादव वय २५ वर्ष रा. कुंभारे कॉलोनी, कामठी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि तिडके यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे गिट्टीखदान</u> :—** कु. वैशाली नंदकिशोर उईके, वय १९ वर्षे, रा. जगदीश नगर, कपील किराणा जवळ, गिट्टीखदान, नागपूर ही दिनांक २७.०९.२०२५ रोजी ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा सलवासुट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे गिट्टीखदान</u> :—** अल्ताफ ईकबाल अहमद, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं. ५, जाफर नगर, चर्च जवळ, नागपूर हे दिनांक १५.०९.२०२५ रोजी १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे पांढरे, अंगात— निळया रंगाचा शर्ट व निळया रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. सोबत ॲक्टीव्हा गाडी क्र. एम.एच ३१ ई.जी ४६३८ हे घेवून गेले आहे.



वैशाली



अल्ताफ

.

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# <u>वाहतुक शाखेची प्रेसनोट</u>

वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीत मे. टी अॅण्ड टी इन्फ्रा लिमिटेड फुटाळा टर्नींग तर्फे ते कॅम्पस चौक पर्यंत सिव्हीस रोड येथे सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम ३० दिवसात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे. त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**अमरावती रोड, फुटाळा टर्निंग कडुन कॅम्पस चौकाकडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- रविनगर चौकाकडुन अमरावती रोड वाडी कडे जाणारी वाहतूक ही फुटाळा टर्निंग कडुन उजवे वळण घेवुन बिरसामुंडा चौकातून डावे वळण घेवुन कॅम्पस चौक मार्गे अमरावती रोड वाडी कडे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक ०५.१०.२०२५ रोजी पासून ते दि. ०४.११.२०२५ रोजी पर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/-
**( लोहित मतानी, भापोसे )**
पोलीस उप आयुक्त, वाहतूक,
नागपूर शहर